ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ४८

सोनाली देव – घैसास
(इ. १०वी १९८९)

दि. २६ डिसेंबर २०२१

एका कारखान्यामध्ये मी कामगार आणि त्यांचे अधिकारी अशा सगळ्यांना एकत्रित जर्मन शिकवायचे. माझं शिकवणं हे कायम interactive असतं. एक–दोन दिवसांनी मला असं लक्षात आलं की ही सर्व मंडळी वर्गात एकमेकांमध्ये मिसळून वागत नाहीत. त्यांच्या डोक्यात अधिकारी आणि त्यांच्या हाताखाली काम करणारा गट ही तफावत पक्की होती. Role play मध्ये मी अधिकाऱ्यांना जर waiter, secretary अशी कामं दिली तर ते तयार नसायचे. मग मी त्यांना सांगितलं की तुमची पदं दरवाजाच्या बाहेर ठेवा तरच आपल्याला शिकण्याचा निखळ आनंद घेता येईल. यामुळे वर्गात मोकळेपणा आला आणि निदान शिकताना तरी सर्व विद्यार्थी आपल्या पदांचे भेदभाव दूर ठेऊ शकले. कधी–कधी शिक्षकाला विद्यार्थीवर्गाचे स्वभावविशेष, त्यातील बारकावे समजून घ्यावे लागतात आणि त्याप्रमाणे शिकवण्याची दिशा ठरवावी लागते. सुदैवाने मला कधी पुरुषसत्ताक विचारांशी माझ्या कामाच्या प्रवासात थेट झगडावं लागलं नाही. कधी वाईट अनुभव आले नाहीत. कधी–कधी कामगारांशी बोलताना त्यांना shop floor वर येऊन एकटी बाई आपल्याशी बोलते, तसंच जर्मन अधिकाऱ्यांना आपलं म्हणणं समजाऊन सांगते, याचं कौतुक वाटायचं.



कै. मा. दादा नवाथे



चारूताताई पुराणिक



शीलाताई ओमेन

**प्रशालेत प्रवेश आणि अनेक भाषांची ओळख**

चौथीपर्यंत मी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत होते. पुढे इंग्रजी माध्यमाला परवानगी न मिळाल्यामुळे चौथीनंतर ती शाळा बंद पडली. तेव्हा मी प्रबोधिनीची पूर्व परीक्षा दिली आणि ती उत्तीर्णही झाले व माझा प्रशालेत प्रवेश झाला. प्रबोधिनीत आल्यावर तिथल्या वातावरणातील फरक मला खूप प्रकर्षाने जाणवला. Miss, madam आणि teacher या वातावरणातून मी एकदम ताई, दादा, आण्णा म्हणायच्या संस्कृतीमध्ये आले. शाळेत चपला न घालता वावरणं आणि पूर्ण वास्तूत मुक्त संचार करण्याची मुभा असणं मला भन्नाट आवडायचं.



शाळेतल्या आम्ही

मला शाळेतल्या काही गमती अजूनही ठळकपणे आठवतात. त्यावेळी अशोकराव निरफराके तिसऱ्या मजल्यावर वाचन कक्षात काम करायचे. तिथे असलेल्या फळ्यावर मी रोज चित्रं काढायचे. अशोकरावांनाही त्याचं कौतुक असायचं. दादा नवाथ्यांची पण अशीच एक आठवण आहे. आम्ही काही मुली त्यांच्या कक्षात मधल्या सुट्टीत त्यांच्याशी गप्पा मारायला बिनधास्त जायचो. त्यांनी आमच्यातल्या काहींना नक्षत्रांवरून नावं दिली होती. त्यात ते मला आश्लेषा अशी हाक मारायचे. मला ते छान वाटायचं. एका परिस्थिती ज्ञानाच्या तासाला आमच्या वर्गावर आण्णा आले होते. त्यांनी सर्वांना दाखवण्यासाठी त्यांच्याबरोबर कॉर्डलेस फोन आणला होता. तो कसा चालतो हे दाखण्यासाठी त्यांनी माझ्या घरी फोन लावला. थेट वर्गामधून घरच्यांशी फोनवर बोलण्याचा तो अनुभव फारच मजेचा होता. या व अशा अनेक प्रसंगांमधून प्रबोधिनीबद्दल आपुलकी निर्माण होत गेली.

शाळेत असताना तंबूमधल्या शिबिरांमध्ये मी आवडीने सहभागी व्हायचे. तिथल्या गावांमध्ये जाऊन शेणाने जमीन सारवणं, भांडी घासणं, स्वयंपाककृतीत मदत करणं, ठरवून दिलेली दिनचर्या पाळणं अशा अनेक गोष्टींतून स्वयंशिस्त, गटकार्य यांचा अनुभव घेता आला.

मला भाषेची गोडी लहानपणापासूनच होती. प्रशालेतल्या अनुराधाताई आफळे, चारुताताई पुराणिक, शीलाताई ओमेन, कविताताई ठुबे, सुप्रियाताई दर्प व हेमाताई डोळे या भाषा शिक्षिकांमुळे माझ्या भाषेच्या आवडीला आणि माझ्यातील शिकवण्याच्या इच्छेला खतपाणी मिळालं असं म्हणायला हरकत नाही. मी नशिबवान आहे, की हे एका पेक्षा एक असे भाषा दिग्गज मला पाचवी, सहावी आणि सातवीच्या टप्प्यावर अप्रत्यक्षपणे घडवत गेले. या सर्व भाषा शिक्षिकांची भाषेविषयीची तळमळ आणि ती भाषा जगवण्याची इच्छा, प्रेम आणि आस्था त्या काळात केवढी होती हे आता मला समजू शकतं. मुलांपर्यंत भाषा विविध माध्यमातून, प्रयोगातून कशी पोचवता येते याचे अनेक धडे या सर्व तायांनी नकळत तेव्हाच दिले. प्रत्येकीची भाषा शिकवण्याची स्वतंत्र शैली होती ज्याच्या आधारे त्यांनी भाषेची गोडी माझ्यात रुजवली. बरेचदा शिक्षकांना माहित नसतं की त्यांच्या शिकवण्यातून विद्यार्थ्यांच्या मनात ते अप्रत्यक्षपणे चांगल्या विचारांची बीजं पेरत असतात!

परकीय भाषा असोत किंवा भारतीय भाषा असोत, विद्यार्थ्यांमध्ये भाषेची आवड निर्माण करायला, त्यांना भाषेचं सर्वांगाने आकलन व्हायला, तिचा गाभा खोलवर समजून घ्यायला आणि संवाद साधायला सर्वस्व झोकून देणारे भाषा शिक्षक गरजेचे असतात. आणि नेमकं हे गमक आपल्या प्रबोधिनीतल्या या भाषा तायांनी साधलं असं मला वाटतं.

**महाविद्यालयातील अनुभव**

दहावी नंतर मी कलाशाखेला प्रवेश घेतला. मला वाटतं की व्यक्तिमत्त्व विकसनाचा खरा काळ हा माझा शाळेनंतर सुरू झाला. मला महाविद्यालयीन आयुष्यातसुद्धा उत्तमोत्तम प्राध्यापक मिळाले. बारावीत मी कलाशाखेत पुणे बोर्डात दुसरी आले आणि समाजशास्त्रात महाराष्ट्रात पहिली आले. मला माझ्या M.Phil. पर्यंतच्या शिक्षणासाठी महाराष्ट्र सरकारची शिष्यवृत्ती देखील मिळाली होती.

माझा कॉलेज काळ हा अनुभवसंपन्न गेला. एक आठवण सांगायची म्हणजे कॉलेजच्या प्रथम वर्षाला कॉलेजच्या निवडणुका रद्द झाल्या. त्या ऐवजी प्रतिनिधींची निवड गुणवत्तेनुसार व्हावी असा नियम आला. ध्यानीमनी नसताना बारावीतल्या गुणांमुळे माझ्याकडे संपूर्ण कला शाखेचं नेतृत्व सोपवण्यात आलं. सगळं वातावरण अगदी तापलेलं होतं. निर्णयाबाबत प्रचंड नाराजी असतानासुद्धा सर्व राजकीय पक्षांशी संलग्न संघटनांचे विद्यार्थी माझ्याशी अतिशय नीट, आदराने वागायचे बोलायचे हे मला विशेष नमूद करावसं वाटतं. गंमत म्हणजे मला त्यावर्षी काही काळ कॉलेजमध्ये पोलीस संरक्षण दिलं होतं. सलग दोन वर्षं आमच्या वर्गातल्या आम्ही काही जणींनी अंध मुलांसाठी पेपर लिहिण्याचं नियमित काम केलं. खूप वेगळा अनुभव होता तो! पुढे जाऊन बेंगळुरूला पण मी काही काळ हे काम केलं. तसेच कॉलेजमध्ये असताना German social gatherings आयोजित करणं व जर्मन नाटकं, गाणी, स्पर्धा यात सहभागी होणं हिरीरीने केलं. पदवी चालू असताना मी काही शालेय मुलांना विनामूल्य जर्मन शिकवलं.

**जर्मन भाषेमध्ये करिअर**

त्या काळी परदेशी भाषेकडे करिअर म्हणून तितकंसं पाहिलं जायचं नाही. अकरावीपासून मी जर्मन भाषा शिकायला सुरुवात केली. भाषा म्हणून मला ती आवडायला लागली आणि त्यातच पुढे शिक्षण घ्यायचं असा निर्णय मी घेतला. पुढे जर्मनमध्येच मी बीए, एमए आणि एम्फील असं सर्व शिक्षण घेतलं. स. प. महाविद्यालयामध्ये बीए करताना प्रा. दिलिप राजगुरू व पुणे विद्यापिठात एमए आणि एम्फील करताना डॉ. नीती बडवे व माझ्या गाईड डॉ. सुनंदा महाजन हे मला प्राध्यापक आणि अधिमित्र (mentor) म्हणून लाभले. अशा प्राध्यापकांकडून शिकताना माझं जर्मन साहित्याबद्दलचं ज्ञान तर पक्कं झालंच पण त्याशिवाय विषयाशी समरस होऊन कसं शिकवावं हे देखील कळू लागलं. या गुरुंनी आम्हाला परीक्षार्थी न बनवता विद्याव्यसनी बनवलं यासाठी मी त्यांची कायमच ऋणी राहीन.

एकीकडे कॉलेज सुरू असताना मी Goethe Institut, Max Mueller Bhavan, Pune येथे जर्मन भाषेच्या सर्व levels देखील पूर्ण करत होते. माझ्या तेथील शैक्षणिक कामगिरीमुळे मला त्यांच्याकडून १९९८-१९९९ साली जर्मनीला जाऊन बर्लिनमधील Goethe Institut मध्ये शिकण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. इंटरनेट, फोन वगैरे आपल्या इथे तितकासा नसलेला तो काळ होता. त्यामुळे जर्मन भाषा जरी उत्तम अवगत असली तरी विविध माध्यमांमधून भाषेचा अनुभव घेण्याची सोय कमीच होती. आता मात्र जर्मनी आणि जर्मन प्रत्यक्ष अनुभवायची संधी मिळाली होती. माझा जर्मनीमध्ये रहायचा अनुभव खूप सुखद होता. Goethe Institut, Berlin मध्ये जगभरातून विद्यार्थी आले होते. मला अजून आठवतं की विमानातून उतरल्यावर थेट institute मध्ये आम्ही पोचलो आणि तिथे आमची निवड चाचणी झाली. या परिक्षेतून माझी सर्वोत्तम स्तरासाठी निवड झाली. तिथे शिकत असताना अनेक ओळखी झाल्या. गप्पागोष्टींतून अनेक विचार प्रवाह उलगडत गेले. वेगवेगळ्या देशांतल्या मुलींना व स्त्रियांना भेटल्यावर मला असं जाणवलं की प्रगत देशातल्या स्त्रिया असोत की इतर कुठल्या असोत शेवटी विचार जरी कितीही पुढारलेले असले तरी कुठल्याही स्त्रीच्या विचारांचा गाभा आणि चौकट एकच असते. त्याही आपल्यासारख्याच स्त्रिया आहेत. त्यांनाही आपल्या सारख्याच चिंता, विवंचना आहेत. फक्त त्याची तीव्रता कमी जास्त - एवढाच काय तो फरक! The whole world is under one roof असं मला तिथे शिकताना वाटायचं. तिथे आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या देहबोलीतून, त्याच्या चेहऱ्यावरील हावभावांवरून मला माझ्या प्रकल्पाचा विषय सुचला 'देहबोली - विश्वबोली'! याच विषयावर मी परिक्षकांसमोर सादरीकरण केलं.

बर्लिनमध्ये असताना माझ्या मनात पक्कं होतं की आपण भारताचे आणि आपल्या संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करत आहोत. आपल्याबद्दल परदेशात बरेच गैरसमज होते. ते दूर करणं तसंच सत्य परिस्थितीची जाणीव करून देणं हे ओघाओघानं व्हायचं. अगदी नेहेमीचा गैरसमज हा की भारतात साप आणि हत्ती रस्त्यावर सरसकट फिरतात. तसंच भारतात कायम अंधाराचं साम्राज्य असतं. मी जेव्हा खोदून-खोदून त्यांना काळोखाबाबत विचारलं तेव्हा मला कळलं



**युरोप - जर्मन क्लास**

की आपल्या art films तिथे पाहिल्या जातात आणि त्यातले विषय थोडे वेगळे असतात, त्यावरून त्यांचं असं मत झालं होतं. गंमत म्हणजे आता जेव्हा मी जर्मन मंडळींना इंग्रजी शिकवते तेव्हा Bollywood चे सिनेमे आणि त्यातली गाणी बघून त्यांना असं वाटतं की संपूर्ण भारत झगमगीत आहे. सगळे लोक एकदम श्रीमंत आहेत. त्यामुळे हे समज गैरसमज आता दूर करावे लागतात.

So, while teaching or learning a foreign language one has to be a cultural ambassador representing one's country.



When in the Black Forest, eat the Black Forest cake!

जर्मनीला जाताना मला आई-बाबांनी तिथे खर्चाला लागले तर म्हणून traveller's cheques दिले होते. पण मी मात्र मिळालेल्या शिष्यवृत्तीतून माझा सर्व खर्च भागवला. शिवाय नातेवाईक, मित्र-मैत्रिणींना तिथून भेटवस्तू विकत घेतल्या. मी तेव्हाच यूरोपातले बरेच देशही फिरले. योग्य प्रकारे अर्थ नियोजन करून हे सर्व मी शिष्यवृत्तीच्या पैशातून केलं. त्यातून निर्णय स्वातंत्र्य मिळालं असं मला वाटतं. Goethe Institut ने माझी रहायची व्यवस्था एका लेखिकेकडे पेईंग गेस्ट म्हणून केली होती. तिच्या संपूर्ण घरात वावरण्याची मला मुभा होती. वसतीगृहात रहाण्यापेक्षा हा खूपच वेगळा अनुभव होता. तिच्या स्वभावात तसेच विचारात खूप वेगळेपणा होता. ती तिच्या आधीच्या नवऱ्याबरोबर फिरायला जायची तर त्याच्या नव्या मैत्रिणीबरोबर जेवायलाही जायची. भारतीय समाजमनाशी तुलना करताना हे वेगळं वाटू शकेल. बीए आणि एमए करताना जर्मन स्त्रिया, त्यांचं feminist movements मधलं योगदान, live-in relationships आणि social securities या गोष्टींवर माझं वाचन झालं होतं. पण हे सर्व प्रत्यक्ष बघताना व इतर विद्यार्थी मित्रांशी चर्चा करताना त्यामागची त्यांची भूमिका कळायची. परदेशी भाषा म्हणजे सगळेच परदेशी आचार-विचार आपण आत्मसात केले पाहिजेत असं नाही. धूम्रपान किंवा इतर व्यसनांना ठाम नाही अशी भूमिका मी घेतली. मला या गोष्टींचं कधीच अप्रूप वाटलं नाही आणि कधी taboo म्हणून त्यावर बोलायचं नाही असंही मी केलं नाही. कुठलीही भाषा शिकताना तिच्या साहित्यातून, त्या देशाच्या संस्कृतीतून आपण बऱ्याच चांगल्या गोष्टी टिपून घेऊ शकतो आणि आपल्या विचारांच्या कक्षा रुंदावू शकतो.



Europe-German-Wheels

भाषेमध्ये करिअर असं म्हणताना teaching, translation आणि interpretation असे मुख्य भाग पडतात. आणि यांच्या अंतर्गत खूप संधी असतात. भाषेवर प्रभुत्व असणं हे एक कौशल्य आहे. ते तुम्ही आत्मसात केलं की तुम्हाला नक्की काय करायचं आहे हे तुम्ही ठरवू शकता. आधी मुळापर्यंत शिरून भाषेचा अभ्यास करावा आणि मगच त्या ज्ञानाचा उपयोग करावा असं मला वाटतं.



Christmas market in Salzburg, Austria



Europe-Paris-Eiffel-Tower



At Lake Geneva, Switzerland

एमए केल्या-केल्या मी लगेचच NET परीक्षा दिली व पहिल्या प्रयत्नात ती उत्तीर्णही झाले. यामुळे मला लवकरच एका नामवंत मोठ्या कॉलेजात सिनियर वर्षांना जर्मन शिकवण्यासाठी नोकरी मिळाली. ते काम करताना माझ्या असं लक्षात आलं की एखाद्या मोठ्या संस्थेमध्ये यश मिळवण्यासाठी तुम्हाला शिकवण्याखेरीज तिथल्या राजकारणातही पडावं लागतं. हे करण्याचा तुमचा पिंड नसेल तर कधी-कधी अशा ठिकाणी तुमचा प्रगतीचा मार्ग अडू शकतो. परंतु तेथिल राजकारणात मला रस नव्हता. बराच विचार करून माझ्या लक्षात आलं की तिथे मी आनंदी राहिले नसते. म्हणून मी ती नोकरी सोडली. मी ९ ते ५ नोकरी करण्यासाठी बनलेले नाही असं माझ्या लक्षात आलं. या अनुभवामुळे माझी स्वतःशीच आणखी ओळख झाली. मग मी freelancer म्हणून काम करायचं निश्चित केलं. पुढे जाऊन मला पुण्यातील German collaborations मध्ये तसेच पुणे विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागात संध्याकाळच्या वर्गांना जर्मन शिकवायची संधी मिळाली.



देवरुखच्या वाचनालयात
'हसत-खेळत जर्मन'

याच सुमारास दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे बांधकाम चालू होते. जर्मन मदत असल्याकारणाने काही डॉक्टर्स, नर्सेस यांचा exchange program होता. त्यामुळे तिथल्या अनेक डॉक्टरांना मी जर्मन शिकवायला जायचे. डॉ. धनंजय केळकर आणि इतर डॉक्टर मंडळींना शिकवायला मजा आली. हे शिकवणं संजीवन हॉस्पिटलच्या गच्चीवर व्हायचं. काही डॉक्टर्स हे कॉलेज काळात जर्मन शिकले होते त्यामुळे ते ही अधेमधे जर्मनमध्ये गप्पा मारायला यायचे. अतिशय व्यस्त दिनक्रम असलेले हे सर्व प्रबोधिनीचे डॉक्टर्स जर्मन वर्गात वेळेत उपस्थित असायचे आणि हसत-खेळत पण पूर्ण लक्ष देऊन वर्गात सहभागी व्हायचे याचं मला आजही अप्रूप वाटतं!

**बेंगळुरूमधील काम**


२००१ मध्ये माझं लग्न झालं आणि मी बेंगळुरू येथे रहायला गेले. कामातील गुणवत्ता आणि जर्मन शिकवण्याचा अनुभव ही शिदोरी घेऊन मी एका नविन शहरात प्रवेश केला. निःशंक मनाने मी freelancing करत रहायचं ठरवलं. मला कर्नाटक सरकारबरोबर German - English live interpretations चं काम करण्याचीसुद्धा संधी मिळाली. तिथल्या काही मंत्र्यांच्या घरीही German political delegations बरोबर जाण्याचा योग आला. तसेच software आणि corporate delegations च्या भेटी व trade unions मधील वाटाघाटी यासाठी दुभाषी म्हणून मी काम केलं. पुढे मी काही गोपनीय कागदपत्र पण अनुवादित केली. Corporate world मधलं professionalism मला भावलं. कितीतरी वेळा मी माझ्या मुलीला - केतकीला - कामाच्या ठिकाणी घेऊन जायचे. ती तिच्या प्रॅममध्ये शांतपणे बसायची आणि मी German expats ना इंग्रजी शिकवायचे. Bring your kid to work - हे खऱ्या अर्थानं मी अनुभवलं.

बेंगळुरूमधला एक अनुभव सांगते. एका कारखान्यामध्ये मी कामगार आणि त्यांचे अधिकारी अशा सगळ्यांना एकत्रित जर्मन शिकवायचे. माझं शिकवणं हे कायम interactive असतं. एक-दोन दिवसांनी मला असं लक्षात आलं की ही सर्व मंडळी वर्गात एकमेकांमध्ये मिसळून वागत नाहीत. त्यांच्या डोक्यात अधिकारी आणि त्यांच्या हाताखाली काम करणारा गट ही तफावत पक्की होती. Role play मध्ये मी अधिकाऱ्यांना जर waiter, secretary अशी कामं दिली तर ते तयार नसायचे. मग मी त्यांना सांगितलं की तुमची पदं दरवाजाच्या बाहेर ठेवा तरच आपल्याला शिकण्याचा निखळ आनंद घेता येईल. यामुळे वर्गात मोकळेपणा आला आणि निदान शिकताना तरी सर्व विद्यार्थी आपल्या पदांचे भेदभाव दूर ठेऊ शकले. कधी-कधी शिक्षकाला विद्यार्थीवर्गाचे स्वभावविशेष, त्यातील बारकावे समजून घ्यावे लागतात आणि त्याप्रमाणे शिकवण्याची दिशा ठरवावी लागते. सुदैवाने मला कधी पुरुषसत्ताक विचारांशी माझ्या कामाच्या प्रवासात थेट झगडावं लागलं नाही. कधी वाईट अनुभव आले नाहीत. कधी-कधी कामगार वर्गातील लोकांशी बोलताना त्यांना shop floor वर येऊन एकटी बाई आपल्याशी बोलते तसंच जर्मन अधिकाऱ्यांना आपलं म्हणणं समजाऊन सांगते याचं कौतुक वाटायचं.

माझा एम्फीलचा शोधनिबंध मी बेंगळुरूला गेल्यावर पूर्ण केला. माझ्या शोधनिबंधाचा विषय हा जर्मन कुटुंबव्यवस्था आणि किशोरवयीन वाङ्मय असा होता. संपूर्ण प्रबंध जरी मी जर्मनमध्ये लिहिला तरी मला काही मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय संदर्भ लागणार होते. मी तेव्हा बेंगळुरूवरून प्रबंधाच्या कामासाठी पुण्याला यायचे. आपल्या प्रबोधिनीच्या मानसशास्त्र विभागाच्या अनघाताई लवळेकर यांनी मला विभागाचं ग्रंथालय पूर्णपणे पाहिजे तेवढा वेळ वापरायला दिलं. अजून काय पाहिजे?

**माझे कुटुंब**


प्रबोधिनी मला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटत गेली. माझा नवरा अभय, माझा सख्खा भाऊ कमांडर हेरंब देव आणि सख्खा दीर मिलिंद हे सगळे प्रबोधिनीतलेच! कॉलेजात असताना काही वर्षे मी प्रचितीच्या उपक्रमांमध्येही काम केलं होतं ज्यात मी मुख्यत्वे स्वयं-अध्ययन कार्यशाळा घेतल्या. महेंद्र सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली छात्र प्रबोधनच्या एका उपक्रमा अंतर्गत मी मराठी सही अभियानाचं काम केलं. या निमित्ताने शि. द. फडणीस, द. मा. मिरासदार, सरोजिनी बाबर यांना भेटायचा अतिशय सुंदर योग आला. त्यांच्या मराठीतल्या सह्या पाहून मीसुद्धा मराठीत सही करू लागले. मी पदव्युत्तर शिक्षण घेत असताना उषाताई खिरे यांच्या हाताखाली मेन्सा या संस्थेसोबत काम केलं. त्यात मुख्यत्वे Menli (Mensa Lingua) हा गट मी भाषांसाठी सुरू केला. पुण्यातल्या बऱ्याच शाळांमध्ये gifted मुलांसाठी मराठी, हिंदी, संस्कृत तसेच परकीय भाषांविषयी आस्था निर्माण करण्याचं काम मी कार्यशाळा घेऊन केलं. मुलांचा उत्साह अवर्णनीय असायचा! कॉलेज करत असताना मी राखी विक्रीचंही काम करायचे. मला कलाकुसरीची खूप आवड, त्यामुळे छात्र प्रबोधनमधून मी राख्यांचा कच्चा माल खरेदी करायचे आणि घरी राख्या तयार करून त्या दारोदारी जाऊन विकायचे. हे काम करताना मला जो काही आनंद व्हायचा तो अजून आठवतो. कुठलंही काम छोटं-मोठं नसतं आणि ते करताना लाज वाटता कामा नये हे अनौपचारिक शिक्षण मला प्रबोधिनीतूनच मिळालं! माझे आई-बाबा सुद्धा त्यांची नोकरी सांभाळून प्रबोधिनीच्या कामात जमेल तशी मदत करायचे. Asha Is Hope'86 च्या तिकिट विक्रीचं काम असो, जाहिराती गोळा करणं असो किंवा अगदी बिहारच्या दौऱ्यामधील सहभाग असो - त्यांच्या परीने त्यांनी खारीचा वाटा उचलला. पुढे माझ्या लग्नानंतर आमच्या बेंगळुरूच्या घरी मा. गिरीशराव आले होते. तेव्हा त्यांच्याशी गप्पा मारायला आम्हाला दोघांनाही आवडलं. बेंगळुरूला कामानिमित्तानं येणारे, तिथे काही काळ रहाणारे प्रबोधिनीतले माजी विद्यार्थी नेहेमी घरी यायचे. तसेच काही ताई-दादा तिथे आले असताना त्यांच्या वेळेच्या अभावी भेटणं शक्य नसलं तरी आवर्जून फोन करून आमच्याशी बोलायचे. मला असं वाटतं की काही वर्षांनी batches मधली gap राहत नाही. एकमेकांशी सहज जुळतं आणि त्यामुळेच की काय प्रबोधिनी एकत्र कुटुंबासारखी वाटायला लागते.



**माझे कुटुंब**



**Mensa Lingua ची एक कार्यशाळा – डॉ. उषाताई खिरे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली**



**Asha Is Hope'86**

**Freelancing**

आम्ही २००८ साली पुण्यात परत रहायला आलो. इथे आल्यावरही मला लगेच काम मिळत गेलं. अभयचा कायमच माझ्या कोणत्याही निर्णयावर उत्तम support आहे. पुण्यात आल्यावरही मी विविध प्रकारची कामं केली. एका ऑस्ट्रियन जोडप्याला भारतातून एका मुलीला दत्तक घ्यायचं होतं. त्या मुलीला मी जर्मन शिकवलं. तिचे आई-बाबा आणि तिच्यामधला दुवा मी झाले. हा अनुभव माझ्यासाठी खूप भावनिक होता. मी आता कायमच freelancing करते. पूर्वी ६० मुलांना एका वेळी जर्मन शिकवण्याचा अनुभव घेतला आणि आता मात्र एका विद्यार्थ्याला एका वेळेस online शिकवते. Freelancer असल्यामुळे मला माझ्या वेळेचं नियोजन करून प्रोफेशनल काम आणि कुंटुंबाबरोबर घालवण्याचा वेळ यात योग्य ती सांगड घालता येते आणि विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे custom made courses ही तयार करता येतात. तसेच शिकवताना विविध आधुनिक शैक्षणिक तंत्र वापरता येतात. यात माझी creativity पणाला लागते जे मला अतिशय आवडतं. गेली दहा वर्षं मी जर्मन online शिकवत असल्याने जगाच्या कानाकोपऱ्यातले विद्यार्थी माझ्याकडे येतात. त्यांना जर्मन शिकवताना त्यांच्याकडून मलाही त्यांच्या संस्कृतीबद्दल, त्यांच्या राहणीमानाविषयी शिकायला मिळतं. It is indeed an enriching experience for me too! मध्यंतरी मी एका Russian fashion model ला जर्मन शिकवलं. त्यावेळेस

मला fashion industry, तिच्या New York, Milan, Paris ramp walks चे किस्से ऐकायाला मिळाले! अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधून जर्मनीला जाणाऱ्या लोकांसाठी मी cultural orientation देते. जर्मन सारखी परकीय भाषा शिकताना जर्मनीतील समाज व्यवस्था, तिथल्या चालीरीती, gifting and food etiquettes याचं प्रशिक्षण देणं देखील तितकंच महत्त्वाचं आहे असं मला वाटतं.

पुण्याला परत आल्यावर कामापालिकडे जाऊन मला इतरही काही जर्मनसंबंधातल्या voluntary work करण्याच्या संधी मिळाल्या. जर्मन-मराठी अशी काही लग्नही मी लावली. संत्रिकेतील पुरोहित मनीषाताई शेटे यांना जर्मनीत जाऊन प्रबोधिनी पद्धतीने एक लग्न लावायचं होतं. तेव्हा मी त्यांना थोडंसं जर्मन शिकवलं आणि प्रबोधिनीची विवाह पोथीदेखील जर्मनमध्ये अनुवादित करून दिली. पुण्यातील एका अंधशाळेत जाऊन काही काळ conversational German शिकवलं. हा अनुभवही मला खूप समृद्ध करून गेला! अगदी अलिकडे Dr. Rudolf Steiner यांच्या बालशिक्षणाविषयीच्या एका जर्मन पुस्तकाच्या मराठी भाषांतरात मी मदत केली. हे पुस्तक गेल्याच वर्षी प्रकाशित झालं.

**मी, मराठी व परकीय भाषा**

परकीय भाषेबद्दलचा approach आजकालच्या समाजात थोडा बदलताना दिसतो आहे. आता त्याच्याकडे एक value addition म्हणून पाहिलं जातं. आधी केवळ मार्कांसाठी परकीय भाषा शिकली जायची पण आता सर्वजण याही प्रवाहाकडे सकारात्मकतेने पाहत आहेत. कुठलीही भाषा तुम्ही नीट आत्मसात केली तर त्यात कितीतरी व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत. त्यासाठी तुमच्याकडे passion आणि कल्पकता हवी. Sky's the limit!

प्रबोधिनीमधल्या काही मैत्रिणी नेहेमीच संपर्कात होत्या. पण पुण्याला परत आल्यावर बऱ्याच मैत्रीणी पुन्हा एकदा भेटल्या. मग २०१४ साली जेव्हा आम्हाला दहावी होऊन २५ वर्षं होत होती तेव्हा आम्ही वर्षभर महिन्यातून एकदा असे एकत्र भेटण्याचे वेगवेगळे कार्यक्रम ठेवले. यासाठी आमच्या वर्गातल्या आम्ही चार वर्गमैत्रिणींनी पुढाकार घेतला. त्या वर्षी जुलैमध्ये आम्ही प्रशालेत भेटीचा एक मोठा कार्यक्रम ठेवला व आमच्या वेळच्या बऱ्याच शिक्षकांनाही बोलावले. खूप सगळ्या जुन्या आठवणींना नव्यानं उजाळा मिळाला. काही मैत्रिणी तर एकमेकींना थेट २५ वर्षांनी भेटत होत्या. पण प्रबोधिनीतल्या वर्गमैत्रिणी जरी कितीही वर्षांनी भेटल्या तरी त्यांना रोजच भेटत असल्यासारख्या गप्पा रंगू शकतात. हाच अनुभव मला कॅलिफोर्नियामधल्या सगळ्या मैत्रीणींना २०१७ साली तिथे गेले असताना भेटल्यावर आला. तिथल्या मैत्रीणींबरोबर त्या काही आठवड्यात केलेली धमाल आम्हा सगळ्यांच्या अजूनही लक्षात आहे. आजही प्रबोधिनीमधल्या कोणातरी मैत्रिणीशी बोलले नाही असा एक आठवडासुद्धा जात नाही. मला वाटतं प्रबोधिनीमधल्या सगळ्यांचाच हा अनुभव आहे.



२०१४ – आमचं रौप्यमहोत्सवी वर्ष – एक झलक

माझ्या आई-बाबांनी मुलगा-मुलगी असा फरक कधीच केला नाही. ते अतिशय पुढारलेल्या विचारांचे आहेत. त्यांची आर्थिक स्थिती, त्यांचे पगार आम्हाला अगदी माध्यमीक शाळेपासून माहीत होते. घरातल्या सर्व लहानमोठ्या निर्णयांबाबत आमची मतं कायम विचारात घेतली जायची व त्यावर चर्चाही व्हायची. अजूनही मला माझ्या ओळखीच्या काही कुटुंबांत मुलगा-मुलगी भेद खोलवर रुजलेला दिसतो. 'मुलग्यांचं वेगळं असतं! तुला मुलगी आहे म्हणून तुला नाही कळणार मुलग्यांचं!' असं म्हणणारे महाभागही माझ्या आजू-बाजूला आहेत. स्वतःला सुशिक्षित आणि सुसंस्कृत म्हणवणारी ही मंडळी अशा विचारात आजही अडकलेली दिसतात. सामजिक बदल हे खूप हळू होत असतात हे मी कॉलेज काळात शिकले होते पण त्याची प्रचिती अजूनही येते याचं वाईट वाटतं.



प्रबोधिनीतल्या वर्गमैत्रिणींशी पुर्नभेटी – मैत्र जीवांचे

मराठीमध्येपण लेखन करावं असं मला काही वर्षं वाटत होतं. पूर्वी मी प्रबोधिनीच्या समतोल, छात्र प्रबोधन या अंकांसाठी मराठी कथालेखन केलं होतं तसंच अनुवादित कथाही लिहिल्या होत्या. तीन वर्षांपूर्वी मी लहान मुलांसाठी मराठीतून एक पुस्तक लिहिलं – 'गोष्टी तारा आणि नीलच्या' जे गरवारे बालभवनने प्रकाशित केलं. मराठी भाषा गोष्टीरूपातून, चित्ररूपातून पुढे आणायचा हा माझा छोटासा प्रयत्न! मराठीतील लुप्त होत चाललेल्या शब्दसंपदेचा वापर मी या कथांमध्ये आवर्जून केला आहे. माझ्या मुलीनं – केतकीनं – लहानपणापासून काढलेली कितीतरी चित्रं मी जपून ठेवली होती. ती मी या कथांमध्ये वापरली. बालभवनच्या शोभाताई भागवत यांचं मार्गदर्शन मला मोलाचं होतं. पुस्तकात भरपूर रंगीत चित्रं असल्यामुळे




**पुस्तक प्रकाशन – शोभाताई भागवतांबरोबर**

अगदी लहानग्यांकडूनही मला भरघोस प्रतिसाद मिळाला. लहान मुलं हा वाचकवर्ग मुख्यत्वे डोळ्यांसमोर ठेवून कथा लिहिताना त्यांच्या मनात शिरून विचार करण्याचा आणि त्यांच्या शब्दात या कथा फुलवण्याचा माझा लेखन प्रवास अप्रतिम होता.

**मागे वळून पाहताना**

शिक्षणाबद्दलची माझी काही मतं मांडते. I am a firm believer in non-competitive education. आजपर्यंतच्या प्रवासात मी वेगवेगळ्या प्रकारचे देशी-परदेशी विद्यार्थी पाहिले आहेत. मला असं वाटतं की प्रत्येक मूल हुशारच असतं. काहींना सूर लवकर गवसतो तर काहींना उशिरा. पण आपल्या समाजात अभ्यासातील हुशारीलाच महत्त्व दिलं जातं. 'हुशार' किंवा 'कमी हुशार' हा शिक्का मला फारसा पटत नाही. पाचवीत प्रबोधिनीत प्रवेश न मिळाल्यामुळे त्याचा वाईट परिणाम काही पालकांवर आणि ओघाओघाने त्यांच्या मुलांवर झालेलाही मी बघितला आहे. प्रबोधिनीच्या प्रवेशपद्धतीत IQ ला दिलेलं महत्त्व मला यामुळेच काहीसं खटकतं. त्यातूनच प्रबोधिनीचे काही विद्यार्थी पुढच्या आयुष्यात आपण १४० च्या वर म्हणजे कोणीतरी जगावेगळे आहोत असा वृथा गर्व बाळगताना दिसतात. यामुळेच समाजातील दरी वाढत जाते. पाचवीच्या टप्प्यावर मुलाला अशा परिक्षांना बसवून आपलं मूल हुशार आहे की नाही हे ठरवणाऱ्या पालकांचे विचार बदलणे आवश्यक आहे. हुशार मुलांच्या शाळेत आपल्या पाल्याला प्रवेश मिळाला म्हणजे आपली जबाबदारी आता संपली असा काही पालकांचा दृष्टीकोन दिसतो किंवा सतत शाळेच्या तत्त्वांवर अविश्वास दाखवणारेही काही पालक असतात. मुलाचा एक हात शाळेने तर दुसरा हात पालकांनी धरणे गरजेचे आहे. तरच त्या मुलाचा शैक्षणिक प्रवास आनंददायी होईल.

**ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात झालेल्या १०० गिफ्टेड या प्रदर्शनातील पोस्टर**









Cleared Net in first attempt for German language .
1 st rank for M Phil German Literature
**scholarship from Goethe institute** for highest level German proficiency course (Oberstufe)
**taught German to 5 year old girl** as she was going to be adopted by an Austrian couple .
Live interpretation for German political delegation with Karnataka government

**Sonali Abhay Ghaisas**

**Born** : 30/03/1974

working as free lancer for German as a foreign language .She conducts trainings for all the proficiency levels of Goethe institute. She furthermore works in areas like German speaking , correct German through one to one training as well as on-line.

She is in this field for over 15 years .She had worked **as German trainer , teacher & language expert** for various Indo German collaborations in Bangalore as well as in Pune . She has also undertook assignments in IT , medical and financial areas as an interpreter & translator .

She also conducts workshops for study skills & calligraphy for children .

**Early days :**

**Facets of personality :**

Her linguistic intelligence , interpersonal skills are evident through her profession along with this , she has good spatial & bodily kinesthetic skills evident through calligraphy.

**Guten morgen ! It means good morning**
**Danke ! It means thanks .**
**she chose to learn the language with sincerity ,**
**We wish her progress beyond infinity !**

JPIP Beyond Horizons : Giftedness in 21 st Century

**सतत शिकत राहणे**

स्वतःला जे आवडतं ते शिकायचं आणि धडाडीने ते करायचं हे कुठेतरी प्रबोधिनीने माझ्यावर बिंबवलंय असं मला वाटतं. त्यामुळे कॉलेज काळात मोडी लिपी आणि जपानी भाषा शिकले. सुंदर हस्ताक्षर, calligraphy अशा कला अवगत केल्या आणि महाराष्ट्रात विविध ठिकाणी त्याच्या कार्यशाळा घेतल्या. वयाच्या चाळीशीनंतरसुद्धा मी काही नविन छंद जोपासत आहे. मी watercolour paintings अगदी शून्यातून शिकले. कलाप्रेमी असल्यामुळे watercolours करताना Impressionism व Post-Impressionism या दोन कालखंडाचं मी भरपूर वाचन केलं आणि Claude Monet, Berthe Morisot व Vincent van Gogh या कलाकाराच्या प्रेमात पडले! मला गायनाची आवड आहे. के.एल. सैगलपासून ते K-pop पर्यंत सर्व प्रकारचं संगीत मी ऐकते. स्त्री हा जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे मी Gender Studies मध्ये एमए करत आहे. सध्या फ्रेंच भाषेची C1 (पाचवी) level शिकत आहे. फ्रेंच भाषा शिकताना मी जर्मनबरोबर फ्रेंचचा तुलनात्मक अभ्यास करते. भाषेतले तसेच या दोहोंच्या व्याकरणातले बारकावे, खाचखळगे समजून घेताना या भाषांच्या विस्ताराची जाणीव मला होते. फ्रेंच वर्गातील माझे मित्र-मैत्रिणी वयाने खूप लहान आहेत. त्यांच्याशी तसेच माझ्या विद्यार्थीवर्गाशी बोलताना जाणवतं की आत्ताची मुलं multitasker, planner आणि विचारांनी स्पष्ट आहेत. परंतु मला मैत्रीमध्ये, नात्यांमध्ये हल्ली use and throw ही tendency बोकाळताना दिसते. मला आवर्जून सांगावसं वाटतं की वैयक्तिक पातळीवर नातेसंबंध आणि मैत्र टिकवा. मैत्रीला वेळ द्या. तुमच्यातील सर्जनशीलता आणि संवेदनशीलता जपा. सामाजिक पातळीवरही जशी जमेल तशी मदत करा. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तुमच्या छंदालाच तुमचं आयुष्य बनवा. मला माझ्या भाषाभ्यासाच्या छंदातून माझं करिअर घडवता आलं आणि त्यासारखी सुरेख कोणतीही गोष्ट नाही!



**“Cabin in the Woods” - Fall colours in New England**



**“Yosemite Calling” - a minimalist watercolour**



**“Mortal Beauty” - wet on wet watercolour**



**“Blissful Nature” - a triptych in acrylic**

## RAPID FIRE

१. आवडते पुस्तक – Letter to a Teacher by the Schoolboys of Barbiana

२. आवडते चित्रपट – एक कप च्या, Mr. and Mrs. 55, Casablanca, Roman Holiday

३. छंद – painting, learning languages, photography, निसर्ग निरीक्षण

४. प्रबोधिनीतला लक्षात राहिलेला उपक्रम – तंबूशिबिरं

५. लक्षात राहिलेले शिक्षक – अनुराधाताई आफळे, चारुताताई पुराणिक, गिरीशराव बापट

६. पहिली प्रतिक्रिया

- भाषा – Learn a language and live a new life!
- शिक्षण – Non-competitive
- विद्यार्थी – Total immersion
- ज्ञान प्रबोधिनी – अनुभवांची गुंफण

७. आणखी एकदा आयुष्य जगायची संधी मिळाली तर शास्त्रीय गायिका किंवा interior designer व्हायला आवडेल.

**सोनाली देव – घैसास**
**9975787463**
**sonali.ghaisas@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – चिन्मयी खरे** **संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org